महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८९ वा | दिनांक : १७/०९/२०२५ | वार : बुधवार

## मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सदन घोटाळ्यातील आरोपी चिमणकर बंधूंना निर्दोष ठरवले

**मुंबई** : उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळ्याप्रकरणी चिमणकर बंधूंना दोषमुक्त करत मंत्री छगन भुजबळ यांना मोठा दिलासा दिला आहे. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि राजेश पाटील यांच्या खंडपीठाने कृष्णा, प्रशांत आणि प्रसन्न चिमणकर यांना निर्दोष ठरवले. याच चिमणकर बंधूंनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनाचे बांधकाम केले होते. या निर्णयामुळे तत्कालीन बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

या घोटाळ्याप्रकरणी छगन भुजबळ यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते, ज्यामुळे त्यांना काही काळ तुरुंगातही राहावे लागले. नंतर महायुतीसोबत आल्यानंतर त्यांना याच प्रकरणात न्यायालयाने क्लीनचिट दिली. आता चिमणकर बंधूंनाही दोषमुक्त केल्यामुळे हे प्रकरण अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

मुंबईतील अंधेरी येथील आरटीओच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसनाची अनुमती देताना त्या बदल्यात संबंधित कंपनीकडून दिल्ली येथे महाराष्ट्र सदानाच्या इमारतीची पुनर्बांधणी तसेच मुंबई येथे मलबार हिल येथे विश्रामग्रह बांधून घेण्यासाठी राज्य सरकारने कंत्राट दिले होते. या कामाची कोणतीही निविदा प्रक्रिया राबवण्यात आली नाही.

भ्रष्टाचारविरोधी पथकाने केलेल्या आरोपांनुसार, संबंधित विकासक कंपनीने प्रकल्पाचे हक्क दुसऱ्या विकासक कंपनीला विकून मोठा नफा कमावला. राज्य सरकारच्या नियमांनुसार कंत्राटदाराला २० टक्के नफा अपेक्षित असताना, पहिल्या विकासकाला तब्बल ८० टक्के नफा मिळाला. आस्थापनाने या व्यवहारातून १९० कोटी रुपयांचा नफा मिळवला, ज्यापैकी १३ कोटी ५० लाख रुपये भुजबळ कुटुंबीयांना दिल्याचे आरोप करण्यात आले होते.

या प्रकरणात २००५ साली कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता विकासकाची नेमणूक केल्याचा मुख्य आरोप ठेवण्यात आला होता. त्यानंतर, अंमलबजावणी संचालनालयाने पीएमएलए कायद्यांतर्गत यांप्रकरणी कारवाई केली होती. एसीबीने मुंबई सत्र न्यायालयात आयपीसी कलम ४०९ (सरकारी मालमत्तेचे नुकसान) आणि कलम ४७१ (अ) (बोगस कागदपत्रे तयार करणे) अंतर्गत आरोप दाखल केले होते.

## निवडणुकीसाठी लाडक्या बहीणींचा वापर करून घेतला : बच्चू कडू



**अमरावती** : प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेती प्रश्नावरून राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. शेतकरी कर्जमाफी, अतिवृष्टी तसेच शेतमालाचे दर व शेतकरी आत्महत्या या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच लाडकी बहीण योजने वरून सुद्धा बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, राज्य सरकार आता सांगत आहे की आमच्याकडे पैसे नाहीत. मात्र, निवडणुकी अगोदर तुम्ही लाडक्या बहिणींना तीन हप्ते एकत्र पैसे दिले. जशा निवडणुका झाल्या तशा अर्ध्या लाडक्या बहिणी अपात्र केल्या. पैशाअभावी लाडका भाऊ प्रशिक्षणार्थी योजना ही बंद करुन टाकली. कारण हा फक्त निवडणूकीपुरते कार्यक्रम होता. हा मदत म्हणून कार्यक्रम नसून त्यांचा राजकीय वापर करून घेण्यासाठी होता, अशी टीका बच्चू कडू यांनी केली आहे.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, मला वाटते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील की नाही हेच माहिती नाही. कारण प्रशासन ठेवून सगळा माल जमा करायचा आहे. ना नगरसेवक, ना जिल्हा परिषद सदस्य सगळा नियंत्रण एकाच ठिकाणाहून करायचे आहे. निवडणूक आयोग भाजपाच्या कार्यालयातून चालावा. ईव्हीएम देखील भाजपाच्या कार्यालयात ठेवा लोक येतील बटन तुम्ही दाबा, असा हल्लाबोल कडू यांनी केला आहे.

जयकुमार गोरे यांना भाजपाचे डोके आहे. त्यांना लोकांची डोकी थोडीच आहेत. आमचे डोके हे सामान्य लोकांचे डोके आहे. आमदारांचे पगार जर दहा वर्षात ७०००० वरुन तीन लाखापर्यंत जात असेल आणि दिव्यांग बांधवांचा निधीसाठी लढावे लागत असेल, सोयाबीन ३४०० रुपयांना विकावे लागत असेल, कापसावर शुल्क लागणार असेल, तर मग करणार काय? असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, आता आम्हाला सांगता शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी पैसे नाहीत. देशातील २०० उद्योगपत्यांचे तुम्ही १८ ते २४ लाख कोटी कर्ज माफ केले आहे. शेतकऱ्यांचे ३० ते ४० हजार कोटी कर्ज माफ करायला काय होते असे कडू म्हणाले. आमचे सोयाबीन, तूर, धान याला २० टक्के बोनस द्यायला पाहिजे, त्यासोबतच जीएसटीचा परतावा देणार असेही सांगितले होते, मात्र काहीच होते नाही असे कडू म्हणाले.

तसेच अतिवृष्टी झाली त्यावर कोणी बोलायला तयार नाही. सोयाबीन ३ हजार ४०० रुपयांनी विकायला निघणार आहे त्यावर सरकार बोलायला तयार नाही असे कडू म्हणाले. १५ ऑक्टोबरच्या आत सोयाबीन खरेदी केंद्र सुरु झाली नाहीतर आम्ही सोयाबीन कलेक्टर आणि पालकमंत्र्यांच्या घरात नेऊन टाकणार असल्याचा इशारा कडू यांनी दिला आहे.

आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहिरात मोहिमेवर जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले की, शिवाजी महाराज केवळ मराठ्यांचेच आहेत असे दाखवण्याचा प्रयत्न जाहिरातीतून होत आहे. यामागे सर्व महापुरुषांना जातींमध्ये वाटून टाकण्याचे षड्यंत्र असून, मराठा आंदोलन संपल्यावर शिवाजी महाराजांच्या पायावर फूल वाहताना देवा भाऊ दाखवणे हा याच षडयंत्राचा भाग आहे. जाती-जातींमध्ये आणि महापुरुषांमध्ये भांडणे लावण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप करत हे सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेनुसार होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

## बंजारा अन् वंजारी एकच? धनंजय मुंडे

**यवतमाळ** :सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी वंजारी व बंजारा समाज एकच असल्याचे वादग्रस्त विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत असून, पोहरादेवीच्या महंतांनीही त्यांच्या विधानाचा निषेध केला आहे. बंजारा व वंजारी हे दोन्ही समाज वेगवेगळे आहेत, असे ते यासंबंधी मुंडे यांना ठणकावून सांगताना म्हणालेत. 'याडीकार' पंजाबराव चव्हाण यांनीही या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीका केली आहे.

बीडमध्ये सोमवारी बंजारा समाजाचा मोर्चा निघाला. या मोर्चात हैदराबाद गॅझेटमधील नोंदीच्या आधारावर बंजारा समाजाला ओबीसीतून एसटी अर्थात अनुसूचित जमातीमध्ये वर्ग करण्याची मागणी करण्यात आली. आमदार धनंजय मुंडे यांनीही या मोर्चाला हजेरी लावत बंजारा समाजाची मागणी रास्त असल्याचे मत व्यक्त केले. तसेच बंजारा अन् वंजारी एकच असल्याचा दावाही केला. त्यांच्या या विधानाचे आता बंजारा समाजात तीव्र पडसाद उमटत आहेत. अनेकांनी त्यांच्या या विधानाचा निषेध करत बंजारा समाजाचा वंजारी समाजाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा केला आहे.

या प्रकरणी बीड, जालना, सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथेही बंजारा समाजाने ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर आता बजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज यांनीही बंजारा व वंजारी हे दोन्ही समाज वेगवेगळे असल्याचे ठणकावून सांगितले आहे. बंजारा व वंजारी एक नाहीत. आरक्षणाच्या दृष्टिकोनातून या दोन्ही समाजांना वेगवेगळे आरक्षण आहे. मराठवाड्यात बंजारा समाज गुण्यागोविंदाने नांदोत. धनंजय मुंडे यांनी आपले मत व्यक्त केले, पण मुळात आरक्षणाच्या दृष्टिकोनातून हे दोन्ही समाज पूर्णतः वेगवेगळे आहेत. त्यामुळे बंजारा समाज आदिवासी प्रवर्गात बसत असेल, तर निश्चितच त्यांना आरक्षण देण्यात यावे अशी आमची भूमिका आहे.

राज्यात बंजारा समाजाचे ५ आमदार आहेत. तसेच ४० मतदारसंघातही बंजारा समाजाची लक्षणीय लोकसंख्या आहे. त्यामुळे तेथील आमदारांनीही बंजारा समाजाच्या मागणीला पाठिंबा द्यावा. अन्यथा धर्मपीठावरून त्यांच्याविरोधात आदेश काढण्याची भूमिका घेतली जाईल, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, बंजारा समाजातील ज्येष्ठ साहित्यिक व प्रसिद्ध 'याडी' कादंबरीचे लेखक पंजाबराव चव्हाण यांनीही या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्या विधानाचा समाचार घेतला आहे. बंजारा व वंजारी समाजाचे समाजिक, सांस्कृतिक, भाषिक व धार्मिक मूल्य वेगवेगळी आहेत. त्यामुळे या दोन्ही समाजांची तुलना करणे अत्यंत चुकीचे व अन्यायकारक आहे, असे ते म्हणालेत. ते पुढे म्हणाले, बंजारा व वंजारी यांच्यात रोटी - बेटी व्यवहार नाही. दोन्ही जातींच्या बोलीभाषा वेगळ्या आहेत. त्यांचा पेहरावही वेगळा आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी चुकीचे वक्तव्य करून बंजारा समाजाची एसटीमध्ये वर्ग करण्याची मागणी कमकूवत करू नये.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५


# लातूर येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ प्रदान




**वैज्ञानिक दृष्टिकोनाचे जतन करणे ही आपली सर्वांची जबाबदारी : डॉ. विवेक मॉंटेरो**

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : लातूर येथील अंनिस राज्य कार्यकारिणी बैठकीत सुधारककार आगरकर पुरस्कार मुंबई येथील पीपल सायन्स नेटवर्क इंडियाचे समन्वयक डॉ. विवेक मोन्टेरो (मुंबई) यांना, तर सुधाकर आठल्ये पुरस्कार अंबेजोगाई येथील प्राचार्य डी.एच. थोरात (अंबाजोगाई) यांना देण्यात आला.

देवयानी भगत (नागपूर) यांना सावित्रीमाई फुले पुरस्कार सुनिता भोसले (शिरूर) यांना भटक्या विमुक्त जमाती प्रबोधन पुरस्कार, कमलाकर जमदडे (बिलोली, नांदेड) यांना सुधाकर आठले युवा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला. या सर्व पुरस्कारांचे स्वरूप रुपये दहा हजार आणि मानपत्र असे आहे.

यावेळी अंनिस ट्रस्टचे अध्यक्ष गणेश चिंचोले आणि लातूर जिल्हा समाज कल्याण अधिकारी अविनाश देवशेटवार, शाहू महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस.एन.शिंदे या सर्वांनी पुरस्कार प्रदान केले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन देशभर 'राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन' म्हणून साजरा करण्यासाठी मोलाचे सहकार्य डॉ. मॉंटेरो यांनी केले आहे. डॉ मॉंटेरो यांनी आजच्या जगातील समस्या यांना वैज्ञानिक दृष्टीकोनाने विश्लेषण करण्याची गरज बोलून दाखवली.

ते पुढे म्हणाले, "देशातील वैज्ञानिक विषयांबद्दलची स्थितीची उकल ही सामाजिक, राजकीय अंगाने तसेच वैज्ञानिक पद्धतीने विचार केल्याशिवाय होणार नाही. वैज्ञानिक पद्धत, वैज्ञानिक दृष्टिकोन, गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षण हे आर्थिक राजकीय समानता व न्याय मिळवण्यासाठी महत्त्वाचे योगदान देऊ शकतात. याचे प्रशिक्षण, याबद्दल जागरूकता वाढायला हवी यावर त्यांनी भर दिला. *प्रश्न विचारणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे हे काम करणारे खरे देशभक्त आहेत. त्यामुळे ते आपण करत राहिले पाहिजे.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे."भटक्या-विमुक्त जाती- जमातीतील अघोरी प्रथा, चाली-रीती याविषयी प्रबोधनकार्य करणाऱ्या सुनीता भोसले यांनी समाजाने भटक्या विमुक्त समाजाला अजूज स्वीकारले नाही ही खंत बोलून दाखवली. अंनिस तर्फे मिळालेला असा पुरस्कार हा आमच्या पारधी समाजातील मिळालेली मी पहिली व्यक्ती आहे ही समाधानाची भावना सुद्धा त्यांनी व्यक्त केली. भटक्या विमुक्त जमातीतील लोकांच्या समस्यांवर न्याय मिळण्यासाठी अंनिस व इतर सामाजिक संघटनांनी काम करण्याची गरज आहे असे आवाहन त्यांनी केले.

याचबरोबर अंनिस ने सुरू केलेल्या ग्रंथमित्र, आधारस्तंभ आणि शतकवीर हे 75 पुरस्कार अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रतर्फे दिले गेले. मुक्ता दाभोलकर यांनी प्रास्तविक केले.फारुक गवंडी यांनी सूत्रसंचालन केले. अंनिस राज्य कार्यकारी समितीचे सदस्य मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, राहुल थोरात, हमीद दाभोलकर, प्रवीण देशमुख, डॉ. अशोक कदम, सम्राट हटकर, विनोद वायंगणकर, अण्णा कडलसकर, मुंजाजी कांबळे, रामभाऊ डोंगरे, निळकंठ जिरगे, प्रकाश घादगिने हे यावेळी उपस्थित होते. रमेश माने यांनी आभार व्यक्त केले.

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा




**छत्रपती संभाजीनगर** : डॉक्टर सौ इंद्राबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात हिंदी दिवस अत्यंत उत्सवात साजरा करण्यात आला. हिंदी विभागाच्या वतीने काव्यवाचन स्पर्धा आणि श्रुतलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. काव्यवाचन स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालयातील बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी पायल सुक्ला हिने प्रथम क्रमांक मिळवला आहे.

बी. ए. द्वितीय वर्ष - माया साळवी ,द्वितीय क्रमांक आणि प्रथम वर्षाची विद्यार्थीनी लक्ष्मी ओंकार हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे. कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक हर्षा शेवाळकर, द्वितीय क्रमांक -जान्हवी कुलकर्णी, तृतीय क्रमांक - अंजली शिंदे. तर श्रुत लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक, पायल शुक्ला, द्वितीय क्रमांक अंजली शिंदे ,तृतीय क्रमांक -अनुजा काळ या विद्यार्थीनींनी यश संपादन केले आहे.

कार्यक्रमासाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ. रमा दूधमांडे, प्रा. डॉ. शोभा हनवते यांची उपस्थिती होती . प्रा. सुचित्रा कुलकर्णी यांनी हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा संदेश दिला . प्रा. पूजा मुठ्ठे यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे जागतिक ओझोन दिन साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : दि १६ सप्टेंबर रोजी उमरगा येथील भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय ओझोन दिन साजरा करण्यात आला या रॅलीस हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा देण्यात आल्या.

ही रॅली महाविद्यालया पासून बस स्थानकापर्यंत घेण्यात आली रॅलीमध्ये समाज जागृती विषयी तसेच पर्यावरण, आरोग्य विषयी घोषणा देऊन रॅलीचे समापन महाविद्यालयात करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले, डॉ विलास इंगळे ,डॉ पद्माकर पिटले ,कैप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले ,डॉ संतोष सुरवसे एनसीसी कैडेट्स ,प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते .

## विद्यार्थ्यांसाठी चार्वाक -लोकायत तत्त्वज्ञान आणि आधुनिकता या विषयावर चर्चा सत्र संपन्न



**छत्रपती संभाजीनगर** : वाळूज, बजाज नगर, छत्रपती संभाजी नगर येथील दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये इतिहास विभाग प्रमुख डॉक्टर सचिन रमेश साळवे, यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागा तर्फे, विद्यार्थ्यांसाठी चार्वाक -लोकायत तत्त्वज्ञान आणि आधुनिकता या विषयावर चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये बीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विचार मांडले, दिव्या राठोड, मनीषा भाले, लक्ष्मी पाटील, सचिन डांगरे यांनी चार्वाक तत्वज्ञान आणि आधुनिकता विषयावर विचार मांडले, लक्षणीय विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी चर्चासत्रात हिरिरीने सहभाग घेतला ज्यात जीवनात अध्यात्म भौतिक सुख, धर्म, या सोबत बुद्धीप्रामाण्यवादी, मानवतावादी विचारांचे महत्त्व आधुनिक कालखंडा सोबत प्राचीन भारतीय विचार धारेत,तत्त्वज्ञान परंपरेत होते, त्यामूळेच आधुनिक विचारांचे मूळ हे प्राचीन चार्वाक भारतीय तत्त्वज्ञानात दिसते हे विद्यार्थिनी मांडले, पटवून दिले.

## निसर्ग कवी

माननीय निसर्ग कवी
ना. धों. महानोर
पळस खेड्याच्या हिरव्या
शेतात हिंडे सुंदर मोर

अजिंठयाच्या पायथ्याला
धरती काळी भोर .
उगवल्या त्यातुनी निसर्गाच्या
या कविता चंद्र चकोर

कवितेचे गाणे ऐकुनी
हसु लागे पोर
भुकेने व्याकुळलेले
शांत होई ढोर

काव्यरुपी बोराच्या
झाडाला गोड बोर .
मराठी काव्याचे भूषण
निसर्ग कवी थोर



**कवि संजय मुकुंदराव निकम**
मालेगांव जि नासिक महाराष्ट्र




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५


## १३२ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय 4, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे "कामगारावर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. करिता शासन यंत्रणेचा ताबा घेणे हे कामगारांचे ध्येय असावे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या 87 व्या व 82 व्या वर्धापन दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर 132 वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा 14 सप्टेंबर 2025 ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, 15 सप्टेंबर 1938 ला मुंबई विधिमंडळात ट्रेड डिस्प्युट बिलावर आपले मत व्यक्त करताना सर, रॉबर्ट बेल यांचा ऐतिहासिक संदर्भ देऊन 1934 प्रमाणे कामगारांची व्यवस्थापना बरोबर केली जाणारी तडजोड सक्तीची केली होती.

परंतु परिस्थितीनुरूप ती ऐच्छिक ठेवण्यात आली होती. तर मग पुन्हा ती सक्तीची का करण्यात येत आहे? कामगारांनी संप करणे म्हणजे नोकरीचे कॉन्ट्रॅक्ट मोडन्यासारखे असल्याने तो फौजदारी गुन्हा ठरत नाही तर दिवाणी गुन्हा होऊ शकेल. ज्यामुळे केवळ नुकसान भरपाई देणे बंधनकारक ठरते. तसेच प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क असेल तर कामगारांना सुद्धा संप करण्याचा हक्क असायला हवा. जे नाकारून कॉंग्रेस सरकार कामगारावर गुलामगिरी लादू इच्छित होती. म्हणून त्या बिलाला कामगाराचे नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा अर्थात कामगारांच्या लोकशाही प्रणित मूलभूत हक्कावर गदा आणली जात असल्याने लोकशाही संपुष्टात येईल. अशा प्रकारे कामगारावर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. तसेच कामगारांच्या समस्या निर्मुलनासाठी ट्रेड युनियन ला मर्यादा पडत असल्याने कामगारांनी सत्ता स्थानी पोहोचण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. असे 'द इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' च्या वतीने आयोजित 'ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्क्स स्टडी कॅम्प' च्या समारोपिय सत्रात 17 सप्टेंबर 1943 ला दिल्ली येथे बाबासाहेबांनी व्यक्त केले होते. करिता वर्तमानात कामगारांच्या समस्याच्या अनुषंगाने बेरोजगारी निर्मूलनासाठी जनतेत जाणीव जागृती केली पाहिजे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना अॅड. राजू बागुल म्हणाले की, समाज जीवनात कामगारांच्या श्रमाची फारशी दखल घेतली जात नाही. 93 टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत तर सात टक्के कामगार संघटित क्षेत्रात असले तरी ते विभाजित आहेत.प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना विलास कटारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी केलेल्या उपाय योजनांची समाज जीवनात अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून विषमतावादी जातीव्यवस्थेचा नायनाट होऊ शकेल.याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, उद्योगपतीच्या उद्योग धंद्यात वाढ होत असली तरी सामान्य जनतेचे मात्र हाल होत आहेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक अॅड. विलास रामटेके यांनी तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, अॅड. विलास रामटेके, , उद्योजक मिलिंद बागुल, अशोक मेश्राम, अॅड. राजू बागुल, विलास कटारे, प्रसेनजीत वाघमारे, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

**शब्दांकन : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : 8983082128 (Wh), 9421678628 (C)
circumference१९६८@gmail.com

## महिलेने विषारी औषध सेवन करून आत्महत्येचा प्रयत्न केला

**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील जांभाळा तालुका गंगापूर येथील पल्लवी निलेश गेहलोत वय 23 राहणार जांभाळा तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर हिने दि. १६ मंगळवार रोजी विषारी औषध सेवन केले.

पल्लवी गेहलोत हिने आपल्या पती निलेश संपत गेहलोत, सपना गेहलोत, नयना पवार ,साधना गेहलोत हे नात्याने नणंद भावजय असून निलेश हा नेहमीच दारू पिऊन घरात राहत नाही व घराकडे लक्ष न देता सतत बाहेर राहतो त्याच्या अनेतिक संबंध आहे.

तो चार पाच दिवसापासून घरा बाहेर राहत होता दि 16 गुरुवारी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास पल्लवी ही जांभाळा तांडा तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे आईच्या घरी असताना चौघांनी मिळून हाता चपट्या नि मारहाण केली.

असल्याची तक्रार दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली होती त्यानंतर काही तासाने पल्लवी हि परत दौलताबाद पोलीस स्टेशन समोर येऊन पोलीस काही कारवाई करत नाही असे म्हणून पोलिसांच्या समोर विषारी औषध सेवन करून जीवन संपवण्याचे प्रयत्न केले आहेव ही घटना मोबाईल मध्ये रिकॉर्डिंग करून समाज माध्यमातून प्रसारित केल्याची माहिती मिळत आहे पल्लवी हिला उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तिच्यावर उपचार सुरू आहे पुढील तपास पोलीस अंमलदार विठ्ठल खंडागळे हे करत आहे.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए

मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५


# माझा मराठवाडा

पाषाणावर पिंपळापरी, जगतोय मराठवाडा
दुष्काळाच्या वणव्यात, होरपळतोय मराठवाडा.

घोषणांच्या चिंब पावसात, रडतोय मराठवाडा
बळीराजाचा फास सोडण्या,झटतोय मराठवाडा.

अजिंठ्याची लेणी कोरतो,काळजात मराठवाडा
पितळखोरा अन् वेरुळात,शांती बुद्ध मराठवाडा.

देवगिरीचा किल्ला सांगतो, अभेद्य मराठवाडा
गौताळयाच्या वनात खुलतो, हिरवा मराठवाडा.

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, गातोय मराठवाडा
शंकरस्वामी बहिणाईसंगे, आषाढ वारीत मराठवाडा.

गोदा शिवना पूर्णा मांजरा, दुधनेत मराठवाडा
पाण्यासाठी तळमळतोय, तहानलेला मराठवाडा.

स्वराज्याला देण्या प्रेरणा, तुळजापुरी मराठवाडा
छत्रपतींचे माहेर शोभतो, घृष्णेश्वरी मराठवाडा.

'मिलिंद' व्हावा लेक म्हणून,झटतोय मराठवाडा.
गीतामृत जगा पाजण्या, सिद्ध ज्ञानदेव मराठवाडा.

आद्य मराठी सरला बेटी, म्हाइंभट मराठवाडा
अस्पृश्यता गोदेत गाडतो, शांतीब्रम्ह मराठवाडा.

गुरूग्रंथात शोभे अभंग, नामयाचा मराठवाडा
जनाईच्या पिठात भेटतो, पांडुरंगास मराठवाडा.

देव तुडवितो माती, पाहुनी गोरोबा मराठवाडा
साई श्रद्धा अन् सबुरी,सांगे पाथरीत मराठवाडा.

दख्खनचा ताज शोभतो, बावन्न दरवाजी मराठवाडा
नांदेडी गुरुद्वारा अन् जांब समर्थी मराठवाडा.

महाराष्ट्रात बिनशर्त सामील,आज जरी मराठवाडा
अजूनही का मागासलेला, माझा प्रिय मराठवाडा.


**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड







# मराठवाडा मुक्तीसंग्राम : लोकशक्ती, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा अमर प्रवास

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास मांडताना आपण केवळ परकीय सत्तेविरुद्ध झालेल्या राजकीय संघर्षाचा विचार करतो. पण हा इतिहास तेवढ्यापुरता मर्यादित नाही; तो समाजातील विविध स्तरांतील असमानता, शोषण, जातिभेद, धार्मिक दडपशाही आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध झालेल्या संघर्षाचाही आहे. भारतात 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, पण या स्वातंत्र्याच्या किरणांचा लाभ सर्व भारतीयांना एकसमानपणे झाला नाही. ब्रिटिश साम्राज्याचे जोखड झुगारून देश स्वतंत्र झाला, तरी हैदराबाद संस्थान निजामाच्या ताब्यात होते. त्याच्या हुकूमशाही वृत्तीमुळे आणि रझाकारांच्या दहशतीमुळे मराठवाडा अजूनही गुलामगिरीतच होता. निजामशाहीच्या राजवटीतील अन्याय, रझाकारांची दहशत आणि सामाजिक-आर्थिक शोषण यांचा भोग मराठवाड्यातील सामान्य माणसाला करावा लागत होता. त्यामुळे मराठवाडा मुक्तीसंग्राम हा केवळ राजकीय स्वातंत्र्याचा नव्हे तर सामाजिक न्याय व लोकशक्तीचा लढा ठरला. म्हणूनच मराठवाड्याला खरी मुक्ती 17 सप्टेंबर 1948 रोजी मिळाली. हा मुक्तीसंग्राम केवळ राजकीय विलिनीकरणाचा प्रश्न नव्हता, तर सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांसाठी झालेला व्यापक संघर्ष होता. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर हा संघर्ष हा जनतेच्या आत्मजागृतीचा, लोकशक्तीच्या एकात्मतेचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा इतिहास आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम या संघर्षाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना आपण हे पाहतो की हा लढा वर्गसंघर्ष, जातीभेद, धार्मिक भेद आणि लिंगदडपशाही यांच्या विरोधातील एक व्यापक सामाजिक चळवळ होती. या चळवळीच्या तात्विक प्रेरणेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान ठळकपणे दिसते. त्यांनी समाजाला दिलेले 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” हे तत्त्वज्ञान मराठवाड्याच्या शेतकरी, मजूर, स्त्रिया आणि दलित घटकांसाठी दीपस्तंभ ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे वंचित समाजात आत्मसन्मानाची भावना जागृत झाली आणि त्यांनी मुक्तीसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला.

निजामशाहीत मराठवाड्याचे समाजजीवन असमानता, दडपशाही आणि शोषणाने पिडलेले होते. शेतकऱ्यांना जमीनदारशाहीच्या जोखडाखाली अवाजवी कर द्यावे लागत असत. वेठबीगारी करणे भाग होते. पिकावरच्या मालकीपेक्षा कराचा बोजा अधिक होता. शेतकरी हा उत्पादन करणारा असला तरी त्याला फक्त उपासमारी उरायची. दलित समाज अस्पृश्यतेच्या बेड्यात अडकला होता. त्यांना सामाजिक सन्मान वा अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण मिळत नव्हते; उलट अनेकदा त्यांना जबरदस्ती, अत्याचार आणि दडपशाही सहन करावी लागत होती. उर्दू भाषेचे वर्चस्व लादून मराठी भाषा व संस्कृतीला दुय्यम दर्जा देण्यात आला. धार्मिक भेदभाव वाढवून बहुसंख्य लोकांना दुय्यम दर्जा मिळत होता. ही सगळी परिस्थिती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'संरचनात्मक अन्याय' (Structural Injustice) म्हणून पाहता येते, जिथे संपूर्ण समाजव्यवस्था ही सत्ताधारी वर्गाच्या हितासाठी कार्यरत असते. याच पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची संकल्पना पुढे ठेवली. त्यांनी सांगितले की स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेतून मुक्ती नव्हे, तर प्रत्येकाला समान संधी, सन्मान आणि हक्क मिळणे होय.

या सामाजिक शोषणाच्या रचनेला रझाकारांच्या दहशतीने अधिक भयानक रूप दिले. कासिम रिजवीच्या नेतृत्वाखाली रझाकार संघटना उभी राहिली. त्यांनी खेड्यापाड्यात हिंसाचार माजवला होता. घरांची लूट, शेतसंपत्तीचा नाश, स्त्रियांवर बलात्कार, जबरदस्ती धर्मांतर, खून आणि दरोडे हे त्यांचे दैनंदिन व्यवहार बनले. शेतकऱ्यांची जनावरे हिसकावली जात, पिके जप्त केली जात होती. गावोगावी रझाकारांची भीती पसरली होती. ही स्थिती समाजशास्त्रीय दृष्टीने सत्ताव्यवस्थेच्या 'दहशतवादी साधनांद्वारे नियंत्रण' या संकल्पनेचे उदाहरण ठरते. या दडपशाहीविरुद्ध मराठवाड्याने आवाज उठवला होता. हैदराबाद राज्य कॉँग्रेसने चळवळीची सूत्रे हातात घेतली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. गोविंदभाई श्रॉफ, शंकरराव चव्हाण, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, दिगंबरराव बिंदू यांसारख्या नेत्यांनी जनतेला संघटित केले. भूमिगत संघटना तयार करून रझाकारांविरुद्ध सशस्त्र संघर्ष छेडला गेला. परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद (धाराशिव), औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या जिल्ह्यांत हजारो कार्यकर्त्यांनी सत्याग्रह, निदर्शने आणि प्रतिकार यांत भाग घेतला. शेतकऱ्यांनी जमिनीच्या हक्कासाठी, विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि भाषेच्या मान्यतेसाठी, तर स्त्रियांनी समाजातील सन्मानासाठी या लढ्यात सहभाग घेतला. हा संघर्ष म्हणजे लोकशक्तीचा अभूतपूर्व जागर होता, जो समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'जनआंदोलनाच्या सामूहिक कृतीचा अभ्यास' (Collective Action) दाखवतो. या जनआंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अप्रत्यक्षपणे सर्वत्र कार्यरत होते. त्यांनी दिलेली आत्मसन्मानाची शिकवण दलित समाजाला संघर्षासाठी उभारी देणारी ठरली. “मानवाला मानव म्हणून समान हक्क मिळाले पाहिजेत” ही त्यांची भूमिका मराठवाड्यातील जनतेच्या रक्तात मिसळली होती. सामाजिक न्यायासाठीचा हा लढा लोकशक्तीच्या ऐक्याने पुढे सरकत राहिला. हिंदू-मुस्लिम ऐक्य, दलित-बहुजन एकजूट, स्त्रियांचा सहभाग या सर्वांनी मुक्तीसंग्रामाला सामाजिक क्रांतीचे रूप दिले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम चळवळीची खासियत म्हणजे तिचे सर्वसमावेशक स्वरूप होय. जाती, धर्म, पंथ, भाषा या भेदांना झुगारून लोक एकत्र आले होते. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उदात्त उदाहरण येथे दिसले. दलित, शेतकरी, स्त्रिया, कामगार, विद्यार्थी असे सर्व घटक या संघर्षात सहभागी झाले होते. यामधील 'सामाजिक ऐक्य' (Social Solidarity) हा समाजशास्त्रातील महत्त्वाचा घटक या लढ्यात प्रकर्षाने दिसतो. संघर्षातील बलिदानांनी आणि त्यागांनी ही ऐक्याची भावना अधिक दृढ केली होती. भारतीय सरकारने निजामाच्या हटवादी भूमिकेविरुद्ध लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. 13 सप्टेंबर 1948 रोजी 'ऑपरेशन पोलो'ची सुरुवात झाली. भारतीय सैन्याने अवघ्या पाच दिवसांत निजामशाही संपवली आणि 17 सप्टेंबर रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. या घटनेने मराठवाड्याच्या जनतेला खरे स्वातंत्र्य दिले गेले. हे स्वातंत्र्य केवळ राजकीय नव्हते, तर ते सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही यांचे नवे दार उघडणारे ठरले.

मराठवाडा मुक्तीनंतर मराठवाड्याचे समाजजीवन झपाट्याने बदलले. मराठी भाषेला शैक्षणिक व प्रशासकीय मान्यता मिळाली. शाळा व महाविद्यालये उभारली गेली. शेतकऱ्यांना जमिनीचा हक्क देणाऱ्या सुधारणा राबविल्या गेल्या. स्त्रियांना शिक्षणाचे दार खुले झाले, त्यांनी राजकीय आणि सामाजिक जीवनात सक्रिय सहभाग नोंदवला. दलित समाजाने संविधानिक हक्कांचा उपयोग करून सामाजिक सन्मान मिळवला. ही सर्व प्रगती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक गतिशीलता' (Social Mobility) ठरते, ज्यामुळे वंचित समाज घटकांना नव्या संधी प्राप्त झाल्या. तथापि, या मराठवाडा मुक्तीनंतरही मराठवाड्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकऱ्यांची आत्महत्या, स्थलांतर, शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी आणि औद्योगिक विकासाचा अभाव ही गंभीर सामाजिक-आर्थिक समस्यांची जखम अजूनही कायम आहे. याचा अर्थ असा की राजकीय मुक्ती मिळाल्यानंतरही सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी संघर्ष सुरू आहे. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास, 'परिवर्तन हा सतत चालणारा प्रवास आहे.' मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाची आजची उपयुक्तता केवळ ऐतिहासिक स्मरणापुरती मर्यादित नाही. तो आपल्याला सामाजिक एकात्मता, लोकशाही मूल्ये, स्त्रिया आणि वंचित घटकांचा सहभाग, अन्यायाविरुद्धचा संघर्ष या मूल्यांची आठवण करून देतो. या दिवसातून आपण शिकतो की लोकशक्तीच्या बळावर कुठलाही अन्याय संपवता येतो. हा संघर्ष नवे समाजनिर्मितीचे मार्गदर्शन करतो.

शेवटी, मराठवाडा मुक्तीसंग्राम हा भारतीय इतिहासातील एक अद्वितीय अध्याय आहे. तो केवळ निजामशाही संपविण्याचा राजकीय संघर्ष नव्हता, तर सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाहीसाठी झालेला व्यापक जनआंदोलन होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा संघर्ष लोकशक्तीच्या सामर्थ्याचा, सामाजिक ऐक्याचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा पुरावा आहे. 17 सप्टेंबर हा दिवस आपल्याला लोकशक्तीचे सामर्थ्य, एकात्मतेचे मूल्य आणि सामाजिक न्यायाची गरज सतत स्मरण करून देतो. म्हणूनच मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन हा केवळ ऐतिहासिक विजयाचा उत्सव नसून, सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र.** 9960103582, **ईमेल –**
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५

# संवेदनशील लेखकाचे मूल्याधिष्ठित प्रकटीकरण: 'झोलांड '




सत्तरच्या दशकात दलित जाणिवेतून लिहिणाऱ्यांनी मराठी काव्यक्षेत्रात मोठी क्रांती केली. वैचारिक, समीक्षात्मक लेखन मोठ्या प्रमाणावर झाले. बलुतं पासून तराळ - अंतराळ, आठवणीचे पक्षी, जीनं अमुचं, माझ्या जल्माची चित्तरकथा, मु. पो. देवाचे गोठणे, दे दान सुटे गिऱ्हाण आणि अलिकडे नुसातं, पाणउतारा आदी शीर्षके असलेला असा स्व कथनांचा संपन्न प्रांत निर्माण झाला. दरम्यान, बाबुराव बागुलपासून ताराचंद खांडेकर, वामन होवाळ आदी कथाकारांनी ताकदीने कथा लिहिल्या. 'थांबा रामराज्य येत आहे,' 'तनमाजोरी,' 'आवर्त' यासारख्या नाट्यकृती परिवर्तनवादी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या आणि त्यांनी वंचितांच्या हृदयात स्थान मिळविले. दलित शब्दास कायद्याने तिलांजली देत परिवर्तनवाद, आंबेडकरवाद असे नामाभिदान आम्ही स्वीकारले. मात्र, कादंबरीच्या प्रांतात आंबेडकरवाद मांडण्यात साहित्यिकांना फारसे स्वारस्य दिसत नाही. अपवाद म्हणून अलिकडच्या काळात पुण्याचे प्रा. जी. एस. भोसले यांची रणरागिणी ही एकमेव कादंबरी आंबेडकरवाद भरभरून मांडणारी असल्याचे जाणवते.

या पृष्ठभूमीवर रंगनाथ पिराजी धांडे यांची 'झोलांड' कादंबरी समाजातील सद्यस्थितीचे साद्यंत वर्णन करणारी आहे. लेखक धांडे मुळात सामाजिक, एका आंबेडकरवादी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, संवेदनशील लेखक. वृत्तपत्रातील त्यांचे वैचारिक स्तंभलेख वाचताना याची अनुभूती येते. त्यांची परिवर्तनवादी विचारधारा, मानवमुक्ती तत्त्वज्ञान, धम्मार्थ ही वैचारिक वांड.मयाची पुस्तके आहेत. आता या कादंबरीच्या निमित्ताने ते ललित साहित्याच्या प्रांतात प्रवेशकर्ते झाले आहेत.

हतबल राहुलची : कादंबरीचा नायक राहुल धारुजी अंभोरे. हा एक उमदा आशावादी तरुण. खेडेगावात बोधिसत्व मंडळ स्थापन करून त्या मार्फत महापुरुषांच्या जयंत्या, स्मृतिदिन साजरे करणारा. एक सुशिक्षित बेरोजगार पण कमालीचा सकारात्मक विचार करणारा, स्वाभिमानी असे त्याचे आदर्श व्यक्तिमत्व उभे करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. समाजाचे भले व्हावे, आपसात भांडणे करू नयेत, खेळीमेळीने राहिले पाहिजेत, असे मानणारा हा युवक. मात्र, त्याची अवस्था 'सच कहती बुढी मगर सुनता है कौन?' अशी झालेली.

हिवरा पेन या खेड्यात जन्म घेतलेला, शिक्षणाच्या निमित्ताने औरंगाबाद (सांप्रतचे छ. संभाजीनगर) येथील नागसेनवनात काही वर्षे वास्तव्य केलेला. नागसेवन ही बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली भूमी. येथे शैक्षणिक संस्कारच असे की, मुका बोलू लागतो, आंधळ्याला दृष्टी येते, दिव्यांग चालू लागतो. शिक्षणरूपी वाघिणीच्या दुधात असलेली ती ताकद आहे. नागसेवन म्हणजे वंचित, बहुजनांच्या विद्यार्थीवर्गाचे हक्काचे माहेरघर.

तेथे अनेक समाजकारणी, राजकारणी नेत्यांच्या सभा संमेलने व्हायची. ती पाहून विद्यार्थ्यांच्या मनात एक वेगळीच उर्मी निर्माण व्हायची. राहुलने तेथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकारणात भाग घेत बऱ्यापैकी दबदबा निर्माण केलेला होता. पदवी तर मिळाली पण अपेक्षित टक्केवारी मिळाली नाही. पदवी घेतल्यानंतर विस्तार अधिकारीपदाची लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही तोंडी परीक्षेत नकार मिळालेला. शासनात बसलेल्या खाबुगिरी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या खाबुगिरी वृत्तीमुळे बेरोजगारी वाट्याला आलेली. आपल्या मूळ खेडेगावात इतरांसह आपल्याही माणसांच्या टीकेचा धनी झालेला राहुल.

ग्रामीण जीवनाचे चित्रण करीत असताना लेखकांनी उभे केलेले सामाजिक वास्तव, त्या त्या माणसांची सुखदु:ख, वेदना वाचकांचे हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. त्याचबरोबर कमळी आणि प्रदिपचे असणारे अनैतिक संबंध, धर्माला दारू पाजून त्याच्या बायकोवर बळजबरी करणारा प्रदीप ह्या बाबी समाज किती रसातळाला जातो आहे, हे उजागर करणाऱ्या आहेत. प्रत्येक गावात अशी भानगडीखोर कुटुंबे असतातच. त्याचे हे प्रातिनिधिक स्वरूप म्हणता येईल.

वस्तीत दोन गट (पार्ट्या) निर्माण झालेले. या गटबाजीला वैतागून आणि काहीतरी काम मिळेल, किती दिवस वृद्ध आई वडिलांच्या जीवावर आयते खायचे, काहीतरी करावे, या उद्देशाने तो मुंबई गाठतो. तेथे ओळखीने बकाल वस्तीतील माधवच्या खोलीत राहतो. कधी भात - खिचडीवर, कधी पोटभर तर कधी उपाशीपोटी दिवस काढतो. गावाकडची चार - दोन कुटुंब असतात, तीही गरीब पण त्यांच्यापरीने मदत करतात.

मुंबईत सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण कार्यालय आदी ठिकाणी नाव नोंदणी करतो. तेथे आलेले कटू अनुभव घेतल्यानंतर घराशेजारी राहत असलेली रुख्मिणी भेटते. तिचे आणखी एक उपकथानक यात येते. तिच्या जीवनाची तीन पिढ्यांची ससेहोलपट ती राहुलजवळ कथन करते. ते वाचून वाचकांचे अंत:करण हेलावल्याशिवाय राहत नाही. राहुल गावी येतो. पुन्हा गावगाडा. लग्न होते. पतीपत्नी दोघेही शेतात चिमट्याच्या सहाय्याने पळ्हाटी उपटण्याचे काम करतात. हाताला फोड येतात. वैताग येतो. 'सगळं सोडून द्यावं आणि भंतेजी व्हावं.' असाही विचार चमकून जातो. पण 'ते काय सोपं आहे?' ही वस्तुस्थितीची जाणीव होते. हिवरा पेनतील बैलपोळ्याच्या दिवशी मारुतीच्या पारावर जाऊन नारळ फोडल्याचा राग मनात धरून जातीय द्वेषयुक्त भावनेतून सवर्ण मंडळीकडून बौद्धवाड्यातील प्रताबसमवेत बाचाबाची, धराधरी आणि जातीवाद करून प्रल्हादला रक्तबंबाळ होईपर्यंत झालेली मारहाण, त्यास पोलिसांनी दिलेले वैयक्तिक भांडणाचे रूप, ह्या बाबी कायद्याची पायमल्ली करीत पोलिस कसे अन्यायग्रस्तावरच अन्याय करतात, याची प्रचिती दर्शवितात. असे अनेक प्रसंग अनेक खेड्यात अनुभवावयास मिळतात. त्याचे हे प्रातिनिधिक उदाहरण म्हणता येईल. कायद्याचे रक्षणकर्तेच अशा वेळी भक्षक बनतात, तेव्हा न्याय कुणाकडे मागावा? या बाबत गांभीर्याने पेन हिवरातील गावगाड्याचे चित्र अधोरेखित झाले आहे. एकीकडे गावातल्या सवर्ण लोकांच्या कुत्सित नजरा तर दुसरीकडे वस्तीतल्या लोकांची दोन पार्ट्यात झालेली विभागणी. विरोधी पार्टीच्या लग्नकार्यात जायचे नाही, मरणा - धरणाच्या कार्यक्रमातही जायचे नाही. आमचा कळप वेगळा, तुमचा वेगळा. जणू पशुच्या कळपागत सगळे. धारुजीच्या निधनानंतर राहुलच्या विनंतीला मान देऊन वस्तिवाले आपल्या पार्ट्या बरखास्त करतात. एक आदर्श नायकाचे चित्र रंगविण्याचा लेखकाचा हा यशस्वी प्रयत्न आहे. सवर्ण माणसांच्या वृत्ती प्रवृत्तीवर यात ओरखडे ओढले आहेत.

संपूर्ण कथानकात विदर्भ आणि मराठवाडा सीमेलगतच्या भाषाशैलीचा लहेजा वापरून प्रादेशिकता जपली आहे, असे वाटते. रिसोड, वाशिम, पानकनेरगाव, हराळ, मसला, देगाव, खडकी, पेडगाव , पार्डी, बेलखेडा, मांगुळ आदी खेडेगावांचे उल्लेख यात येतात. ग्रामीण बोलीचा पुष्कळ वापर झाल्याचे जाणवते. पात्रांच्या संवादातून काही प्रसंग उभे केलेत, ते वाचताना एखादा चलचित्रपट डोळ्यासमोरून सरकत जावा, अशी मांडणी केली असल्याचे दिसून येते. गावातील घनश्याम देशपांडे, आई तुळसाबाई, धर्मा , हसाजी, वामन, उकंडा, शंकर, कळनुजी, भाऊराव, गोमाजी, प्रल्हाद, रामदास, कल्पना, रामकोर, सखुबाई, साहेबराव, तात्यासाहेब, देशमुखांचा प्रदीप, कारभारी, ढाण्या कुत्र्यावानी दिसणारा फौजदार, गणप्या, राम्या, सरकारी अधिकारी उबाळे, मुंबईत असणारे मोरे, आदी मंडळी तर औरंगाबादेत जोगेंद्र कवाडे सरांच्या लाँगमार्च दरम्यान पोलिसांकडून झालेल्या धर - पकडीच्या वेळी महिलांना मदत करणारी कु. विमल हिवराळे, रेखा गावंडे, देविदास दहाघरे त्याची बायको कुसुम, दीपक मोरे, शाम माने, असे अनेकजण अनेक ठिकाणी चपखल बसविलेले आहेत, त्या मुळे कादंबरीचे कथानक पुढे सरकण्यास मदत होते. खूप ठिकाणी ग्रामीण म्हणींचा वापर केलेला आहे. प्रसंगानुरूप जेथे शक्य होईल तेथे निवेदकाने तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे. काही पात्रांच्या तोंडी परिवर्तनाच्या विचारांची वाक्ये दिलेली आहेत. आंबेडकरवादी कादंबरीचा प्रांत सद्या बराचसा रिकामा आहे. 'सभापती' सारखी एखाददुसरी कादंबरी सोडल्यास बाकी नोंद घेण्यासारखे या प्रांतात फारसे सकस लेखन नाही. तेथे परिवर्तनवादी लेखकांसाठी खूप संधी आहेत. त्याचा फायदा घेत हा प्रांत समृद्ध व्हायला हवा.

आदर्श समाजनिर्मिती व्हावी, त्या दृष्टीने राहुलचे प्रयत्न आहेत. 'झोलांड'च्या निमित्ताने एकूण मराठी वाड.मयात मोलाची भर पडेल, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. डॉ. मिलिंद विनायक बागुल यांनी लेखकांच्या लेखनासंबंधी अल्प शब्दांत प्रेरणादायी पाठराखण केली आहे.

बलस्थाने: १. व्हाईट पेपर चांगला, प्रिंट उत्तम, (अर्थात, ही बाब तांत्रिक असल्याने प्रकाशकाधीन असते.) २. वाचकांस खिळवून ठेवण्यात लेखक कमालीचे यशस्वी झाले आहेत. ३. कथनात्मक कादंबरीचे हे उत्कृष्ठ उदाहरण आहे. ( राहुल धारुजी, राहुलचे पाली भाषेतील गाथांचे पाठांतर असते, राहुल महाविद्यालयात अध्ययन करताना चळवळीत भाग घेतो .)४. सुप्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांनी मुखपृष्ठासाठी चांगले चित्र दिले. ५. ललितरम्य आणि वैचारिक लेखन याचा ताळमेळ लावून सोप्या आणि सरळ शब्दांत आंबेडकरवाद मांडण्याचा लेखकाचा प्रयत्न स्तुत्य आहे.आणखी काम करता आले असते:

१. प्रोफेशनल प्रूफ रीडिंग करणाऱ्या व्यक्तीकडून काम करून घेतले असते, तर व्याकरणाच्या भरपूर असलेल्या त्रुटी (चुका) दुरुस्त झाल्या असत्या.२. ४०३ पानांच्या पुस्तकासाठी मुखपृष्ठाचा पेपर किमान ३०० जी. एस. एम. असायला हवा. (अर्थात, ही बाबसुद्धा तांत्रिक असल्याने प्रकाशकाधीन असते.) असे असले तरी त्या मुळे लेखकाच्या मूल्याधिष्ठित सृजनशीलतेला किंचितही तडा जात नाही.

'झोलांड' ग्रामीण भागातील गावगाड्याचे आणि बौद्धवाड्याचे मनसविश्व मुखर करणारी आणि एखादा शहाना - सुरता तरुण काही सकारात्मक करीत असेल तर त्याचे पाय ओढण्याचे प्रयत्न करणारी प्रवृत्ती विशद करणारी कादंबरी आहे.

या एकाच कादंबरीने लेखक धांडे फार मोठे कादंबरीकार होतील की नाही हे आत्ताच सांगणे कठीण असले तरी 'झोलांड' कादंबरीविश्वात निश्चितपणे आपले वेगळे स्थान निर्माण करेल, असा विश्वास वाटतो. पुढील काळात त्यांचेकडून आणखी दर्जेदार लेखन होईल, या अपेक्षेसह भविष्यातील त्यांच्या वाड.मय निर्मितीस मी आभाळभर सदिच्छा व्यक्त करतो.

**प्रा.शिवाजी वाठोरे**

(लेखक ख्यातनाम साहित्यिक, समीक्षक आहेत.)

झोलांड (कादंबरी): लेखक : रंगनाथ पिराजी धांडे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.किंमत: ५५०/-पृष्ठे: ३०३

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १७ सप्टेंबर २०२५

# हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा विस्मृतीत गेलेला नायक : पत्रकार शोएब उल्ला खान

हैदराबाद मुक्तीसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक महत्त्वपूर्ण पण पुरेसा उजेडात न आलेला अध्याय आहे. भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले,परंतु हैदराबाद संस्थान अजूनही निजामाच्या हुकूमशाही जोखडाखाली होते. हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा हा लढा कोणत्याही एका धर्माचा किंवा एका पंथाचा नव्हता तो होता, स्वेच्छाचारी आणि निरंकुश राजवटीविरुद्ध सामान्य जनतेने दिलेला लोकशाहीचा लढा,ज्यामध्ये हिंदू, मुसलमान,शेतकरी, महिला मजूर,विद्यार्थी,अशा सर्वांनी खांद्याला खांदा लावून निजामशाहीला आव्हान दिले. हा संघर्ष भारताच्या अखंडतेसाठी आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी होता.या लढ्यात अनेकांनी प्राणांची आहुती दिली. काहींची नावे लोकस्मरणात आहेत, तर काहींचे बलीदान हळूहळू विस्मृतीत जात आहे.

अशा विस्मृतीत गेलेल्या हुतात्म्यांमध्ये एक धाडसी नाव आहे पत्रकार शोएब उल्ला खान.त्यांनी निजामशाही आणि रझाकारांच्या अत्याचारांविरुद्ध निर्भयपणे लेखणी उगारली. शेवटी त्यांनी प्राणार्पण करून या संघार्षाचे महत्व अधोरेखित केले. इ.स. 1724 पासून आसफजाही घराण्याची सत्ता हैदराबादमध्ये नांदत होती शेवटचे निजाम मीर उस्मान अली यांनी आपले संस्थान हैदराबाद एक तर स्वतंत्र राहवे किवा पाकिस्तानात सामील व्हावे असे प्रयत्न चालवले होते हैदराबादची 85 टक्के हिंदू प्रजा भारतात सामील होण्याच्या बाजूने होती. मात्र जनतेच्या इच्छांचा काहीही विचार न करता निजामाने **"इत्तेहादूल मुसलमीन"** या संघटनेला बळ दिले. तिचे स्वयंसेवक म्हणजेच **रझाकार**,कासीम रझवीच्या नेतृत्वाखाली रझाकारांनी संस्थानात कमालीची दहशत निर्माण केली त्यांचा उद्देश होता स्वतंत्र इस्लामी राजवट स्थापन करणे. त्यामुळे ते संस्थानातील हिंदुना लक्ष्य करीत लुटमार, खून, बलात्कार, जाळपोळ, धर्मांतर इत्यादीचा वरवंटा सर्रास फिरवला जात होता. रझाकारांच्या या कृत्यांना निजामाची मूक समंती होती.निजामाच्या या निरंकुश राजवटी विरोधात संस्थानातील जनतेने अभूतपूर्व असा लोकलढा उभारला पण निजाम सरकारच्या विरोधात बोलणे लिहणे किवा भारताचा समर्थन करणाऱ्या सत्याग्रहीना,नेत्यांना आणि पत्रकारांना अटक करून तुरुंगात टाकले जात होते सरकार विरुद्ध बातम्या देणाऱ्या वृत्तपात्रांवर लगेच बंदी घातली जायची.

## निर्भय पत्रकारितेचा उदय

त्या काळात हैदराबादमधील बहुतेक ऊर्दू वृत्तपत्रे निजामशाहीचे गुणगान करत होती परंतु काही धाडसी पत्रकारांनी सत्याचा आवाज दाबू दिला नाही. एम. नरसिंगराव यांचे ***रयत*** आणि तरुण पत्रकार शोएब उल्ला खान यांचे ***इमरोज*** हे त्यात अग्रस्थानी होते. ही दोन्ही वृत्तपत्रे जनतेच्या आवाजाचे प्रतीक ठरली. रझाकारांच्या अमानुष कृत्यांना आव्हान देत, हुकूमशाहीचे मुखवटे फाडत ही वृत्तपत्रे जनतेच्या मनात लोकशाहीची आस पेटवत होती. शोएबचा जन्म 17 ऑक्टोबर 1920 रोजी आजच्या तेलंगानातील खम्मंम जिल्ह्यात झाला. त्यांचे वडील हबीब उल्ला खान निजाम सरकारमध्ये पोलिस इन्स्पेक्टर होते, पण विचारांनी राष्ट्रवादी आणि गांधीवादी होते. त्यांच्या घरातच शोएबच्या मनात सत्य, अहिंसा, धर्मनिरपेक्षता आणि देशभक्तीचे संस्कार रुजले. लहानपणापासून गांधीजींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. वडील त्यांना प्रेमाने 'शोएब गांधी' म्हणत. मुंबईतून इंटरमिजिएट आणि उस्मानिया विद्यापीठातून पत्रकारितेत पदवी घेतल्यावर शोएबने पत्रकारितेलाच आपले जीवनध्येय मानले. विद्यार्थीदशेतच त्यांनी निजामशाहीच्या अन्यायाविरुद्ध लिहायला सुरुवात केली. त्यांच्या लेखणीची धार तलवारीपेक्षा तीक्ष्ण होती. **'तेज'** या साप्ताहिकातून त्यांनी लेखनास सुरुवात केली. पण सरकारच्या दडपशाहीमुळे ते बंद पडले. नंतर ते ***रयत*** साप्ताहिकातून लिहू लागले येथे त्यांनी निडरपणे निजामशाहीच्या धोरणांवर ताशेरे ओढले. रझाकारांच्या अत्याचारांचा पर्दाफाश केला. सरकारला हे सहन झाले नाही. *रयत* वर बंदी आली. कार्यालयाला कुलूप ठोकले गेले.पण शोएब खचले नाहीत. उलट या प्रसंगाने त्यांचा निर्धार अधिकच पक्का झाला. त्यांनी स्वतःचे स्वतंत्र दैनिक काढायचे ठरवले. आई–पत्नीचे दागिने विकले, लोकांकडून वर्गणी गोळा केली आणि अखेर 15 **नोव्हेंबर** 1947 रोजी "इमरोज" चे पहिले अंक प्रसिद्ध झाले.

## *इमरोज* — लेखणीचे शस्त्र

*इमरोज* अल्पावधीतच लोकप्रिय झाले. ते जनतेच्या वेदना, अन्यायाविरुद्धचा आक्रोश आणि लोकशाहीची हाक व्यक्त करीत होते. शोएबचे अग्रलेख धारदार तलवारीप्रमाणे असत. शोएबचे अग्रलेख समाजात चेतना निर्माण करणारे ठरले. 29 **जानेवारी** 1948 रोजी प्रकाशित झालेला अग्रलेख *"दिन की सरकार – रात की सरकार"* विशेष ऐतिहासिक ठरतो. त्यांनी थेट सरकारला प्रश्न विचारले

- जनतेचे प्रतिनिधित्व करणारे मंत्रीमंडळ का नाही?
- रझाकारांवर कारवाई का होत नाही?
- जनतेच्या इच्छांना डावलून कोणतेही सरकार टिकणार नाही, हे तुम्हाला कळत नाही का?

या अग्रलेखामुळे निजामशाही हदरली. पण हाच क्षण शोएबच्या जीवनातील धोक्याचा वळण ठरला. या निर्भय लिखाणामुळे कासीम रझवी संतापला. धमकीची पत्रे येऊ लागली. सार्वजनिक सभेत त्याने जाहीरपणे म्हटले *"जो हात मुसलमानो की इख्तेदारी के खिलाफ उठता है, वह गिर जाना चाहिए या कट जाना चाहिए."* त्याचा रोख शोएबकळे होता या धमकीनंतर शोएबला असंख्य धमकीची पत्रे आली. तु कौम और देश का गद्दार है *"तुझी बागी कलम शाहे उस्मानीच्या विरोधात आहे..."*

अशा शब्दांत त्यांना धमकावले गेले. पण शोएब झुकले नाहीत. त्यांनी निर्भीडपणे पुढील अंकात रझवीच्या भाषणावर तीव्र टिका केली

## हौतात्म्य

रझवीच्या भाषणाने बेफाम झालेल्या काही रझाकार गुंडांनी शोएबचा हात तोडण्याचा व त्यांना ठार मारण्याचा कट रचला.21 **ऑगस्ट** 1948 च्या रात्री ही धमकी खरी ठरली. *इमरोज* कार्यालयातून आपले काम संपवून मेव्हना इस्माईल खान बरोबर घरी जात असताना शोएबवर रझाकारांनी प्राणघातक हल्ला केला. त्यांचा उजवा हात कापला आणि पाठीत गोळ्या झाडल्या. काही तासांतच या तरुण संपादकाची प्राणज्योत मावलली. त्यांचे वय अवघे 28 वर्षे होते. शोएबच्या मृत्यूनंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. त्यांच्या हौतात्म्याने निजामशाहीविरुद्धचे जनमत आणखी प्रखर झाले. सरदार पटेल तर आधीपासूनच पोलीस कारवाईसाठी ठाम होते, पण शोएबच्या

बलिदानामुळे पंडित नेहरूंच्या मनातील संभ्रमही नाहीसा झाला. एम. नरसिंगरावांनी म्हटले – *"शोएबच्या बलिदानाने पोलिस कारवाईची तारीख जवळ आणली."* अखेर सप्टेंबर 1948 मध्ये 'ऑपरेशन पोलो 'द्वारे हैदराबाद भारतात विलीन झाले.

## मृत्यूनंतरही वैर

"मृत्युनंतरही रझकारांचे शोएबशी वैर संपले नाही. शोएबचा शव कबरीतून उकरून त्याची जाहीर विटंबना करू अशा जाहीर धमक्या रझाकारी वृत्तीचे लोक देत ते पाहून शोएबचे वडील आगापुऱ्यातील शोएबच्या कबरीपाशी कित्येक दिवस बंदुकीसह पहारा देत अशी नोंद धनंजय कुलकर्णी यांनी **'हैदराबादची चित्तरकथा'** या ग्रंथात केली आहे या अमानुष कृत्यांमुळे त्यांच्या बलिदानाची उंची आणखी वाढली.

## विस्मृतीत गेलेले बलिदान

आजच्या पिढीला शोएब उल्ला खान यांचे नाव फारसे माहीत नाही. स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांचे योगदान बहुधा मागे पडले आहे. पण सत्याच्या आणि लोकशाहीच्या लढ्यासाठी आपले प्राण अर्पण करणारा हा तरुण संपादक भारतीय पत्रकारितेच्या इतिहासातील तेजस्वी आदर्श आहे. त्यांचे बलिदान आपल्याला आठवण करून देते की लेखणीची ताकद कुठल्याही तलवारीपेक्षा अधिक प्रखर असते. हैदराबाद मुक्तीसंग्राम हा केवळ एक राजकीय संघर्ष नव्हता, तर तो लोकशाहीच्या मुलभूत मूल्यांचा पुकार होता. या लढ्यातील प्रत्येक हुतात्म्याचे बलिदान विसरता कामा नये. **शोएब उल्ला खान यांचे हौतात्म्य हे लोकशाहीसाठी झगडणाऱ्या पत्रकारितेचे प्रतीक आहे.** त्यांच्या स्मृती जाग्या ठेवणे, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे, ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. कारण स्वातंत्र्य केवळ मिळवायचे नसते, ते सतत जपायचे असते आणि ते जपण्यासाठी निर्भय लेखणी सदैव जागी असणे गरजेचे आहे.

**प्रा.शेख इरफान अय्युब**
इतिहास विभाग
डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन
छत्रपती संभाजीनगर,431001
ईमेल- iasirfan८२@gmail.com